## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून १९७७

**भारताचे संविधान**

क्रमांक ईएक्सएम-१२७६-सतरा.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि याबाबत काढण्यात आलेले आणि राज्यामध्ये किंवा राज्याच्या कोणत्याही भागामध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व नियम आणि आदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या मंत्रालयीन दुय्यम सेवेमधील अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसाठी खालील नियम करीत आहेत :—

### नियम

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम मंत्रालयीन सेवा (अधीक्षक) विभागीय परीक्षा नियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) हे नियम १ जून १९७७ पासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल. तथापि, नियम १० चा खंड (क) हा १ नोव्हेंबर १९७७ पासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांमध्ये,—

(अ) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांचे परिशिष्ट,

(ब) "सहायक" म्हणजे मंत्रालयातील कोणत्याही विभागातील सहायक,

(क) "परीक्षा" म्हणजे दुय्यम मंत्रालयीन सेवेमधील अधीक्षकाच्या पदावरील पदोन्नतीसाठी नियम ११ व परिशिष्ट "अ" अन्वये विहित केलेल्या पाठ्यक्रमानुसार घेण्यात येणारी परीक्षा,

(ड) "सध्या अस्तित्वात असलेले नियम" म्हणजे अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षांबाबतचे हे नियम राजपत्रामध्ये प्रसिद्ध होण्याच्या लगतपूर्वी अंमलात असणारे नियम व आदेश,

३. **पात्रता.**—परीक्षेला बसण्यासाठी पात्र होण्यासाठी सहायकांकरिता विहित केलेली सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा सहायकाने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने सहायक म्हणून ५ वर्षांची अखंड सेवा पूर्ण केलेली असली पाहिजे.

४. **कालावधी आणि संधीची संख्या.**—नियम ३ च्या तरतुदीस अधीन राहून, प्रत्येक सहायकाने त्याच्या सहायक म्हणून ९ वर्षांच्या अखंड सेवेमध्ये आणि तीन संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे :

परंतु, जो सहायक-(एक) अनुसूचित जाती, (दोन) अनुसूचित जमाती. आणि (३) निरधिसूचित व भटक्या जमातीचा असेल, त्याला सहायक म्हणून झालेल्या त्याच्या १० वर्षांच्या अखंड सेवेमध्ये आणि चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होण्याची मुभा दिली जाईल.

आणखी असे की, सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांनुसार एखाद्या संधीचा लाभ यापूर्वी घेतलेला असेल तर ती संधी या नियमांनुसार घेण्यात येणाऱ्या एकूण संधीमध्ये मोजण्यात येईल. या नियमाच्या पहिल्या परंतुकाखाली येणाऱ्या प्रकरणांना देखील हे परंतुक लागू होईल.

५. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम.**—सहायक नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर त्याच्यापूर्वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व सहाय्यकांबरोबरची त्याची अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठीची ज्येष्ठता त्याला गमवावी लागेल. तसेच, अशा ज्या सहायकानंतरचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल त्या सहायकांना ज्येष्ठ असणारे आणि त्याच्यानंतर परंतु नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणारे सहायकदेखील त्याला ज्येष्ठ होतील आणि त्यांच्याखाली त्याची ज्येष्ठता लागेल.

६. **परीक्षा केव्हा घेण्यात येईल.**—सर्वसाधारणतः परीक्षा मराठीमध्ये किंवा इंग्रजीमध्ये किंवा दोन्ही भाषांमध्ये प्रत्येक वर्षी नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये घेण्यात येईल.

७. **परीक्षा घेण्यात न आल्यास त्याचे होणारे परिणाम.**—जर, कोणत्याही कारणावरून, कोणत्याही वर्षी परीक्षा घेण्यात आली नाही तर ते वर्ष नियम ४ मध्ये विहित केलेला कालावधी मोजताना वगळण्यात येईल.

८. **परीक्षेला बसण्यासाठी संधी.**—नियम ५ च्या तरतुदींस अधीन राहून, सहायकाला परीक्षेस बसण्यासाठी कितीही वेळा संधी मिळू शकेल.

९. **अधीक्षकांची नियुक्ती.**—मंत्रालय दुय्यम सेवेमधील कोणत्याही व्यक्तीची, तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय किंवा नियम १० अन्वये त्याला तशी सूट दिलेली असल्याशिवाय अधीक्षकाच्या पदावर नियुक्ती करण्यात येणार नाही :

परंतु, ज्यांचा कालावधी दोन महिन्यापेक्षा अधिक होण्याचा संभव नसेल अशा अल्प मुदतीच्या रिक्त पदांना हा नियम लागू होणार नाही.

आणि असे की, परीक्षा उत्तीर्ण झालेला कोणताही सहायक अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी उपलब्ध नसेल तर ज्यांनी ९ वर्षाची सेवा पूर्ण केलेली नसेल आणि ज्यांच्या नियम ४ मध्ये विहित केलेल्या सर्व संधी घेऊन झालेल्या नसतील अशा, पदोन्नतीसाठी अन्यथा योग्य असलेल्या सहायकांचा विचार पदोन्नतीसाठी करता येईल. ही व्यवस्था, योग्य अर्हताप्राप्त सहायक पदोन्नतीसाठी उपलब्ध होईपर्यंतच चालू राहील.

१०. **सूट.**—खालील व्यक्तींना परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येईल :—

(अ) सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण झालेले सहायक,

(ब) सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये ज्यांना यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आलेली आहे ते सहायक, आणि

(क) नियम ३ च्या तरतुदींअन्वये परीक्षेला बसण्यासाठी पात्र असलेले आणि, १ नोव्हेंबर, १९७७ रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिवशी ४५ वर्षे इतके वय झालेले सहायक, मात्र नियम ५ च्या तरतुदीअन्वये त्यांनी गमावलेली ज्येष्ठता त्यांना पुन्हा मिळणार नाही.

.... ....

११. **पाठ्यक्रम.**—(१) परीक्षा खालीलप्रमाणे दोन भागांमध्ये घेण्यात येईल :—

**भाग एक**—सर्व विभागांना समान असणारे विषय, आणि

**भाग दोन.**—सहायक ज्या मंत्रालयीन विभागाशी संबंधित असेल त्या विभागाचे विशिष्ट विषय.

(२) परीक्षेसाठी भाग एकचा पाठ्यक्रम, कालावधी, प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे कमाल गुण हे परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे किंवा राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे इतर विषय असा असेल.

(३) परीक्षेसाठी भाग दोनमध्ये प्रत्येकी १०० गुणांच्या तीन प्रश्नपत्रिका असतील, त्या प्रश्नपत्रिका मंत्रालयातील संबंधित विभागाच्या विशिष्ट विषयांशी संबंधित असतील. या प्रयोजनासाठी मंत्रालयातील निरनिराळे विभाग आपला स्वत:चा पाठ्यक्रम आणि विषयांची गटवारी विहित करतील.

(४) भाग एकमधील परीक्षा घेण्याची व्यवस्था सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येईल. भाग दोनमधील परीक्षा घेण्याची आणि परीक्षेचा निकाल सामान्य प्रशासन विभागास कळवण्याची आवश्यक ती व्यवस्था मंत्रालयातील निरनिराळे विभाग करतील. भाग एक-मधील परीक्षा संपल्यानंतर भाग दोनमधील परीक्षा घेण्यात येईल. अंतिम निकाल सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहीर करण्यात येईल आणि संबंधित विभागाला कळविण्यात येईल

१२. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक.**—परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्न-पत्रिकेमध्ये एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे मानक असेल.

१३. **अनुग्रह गुण.**—संपूर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या एकूण गुणांच्या ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळवले असतील परंतु, एक किंवा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकांमध्ये ५० टक्के गुण तो मिळवू शकला नसेल तर त्याला त्या विषयांमध्ये जास्तीत जास्त ७ अनुग्रह गुण, जर त्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रयत्नांमध्ये सूट देण्यात आलेली आहे त्यांनासुद्धा ही सवलत देण्यात येईल.

१४. **विशेष गुणवत्ता.**—जो सहायक पहिल्या प्रयत्नामध्ये परीक्षा उत्तीर्ण होईल आणि कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवील त्याच्या त्या प्रश्नपत्रिकेमधील विशेष गुणवत्तेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालामध्ये करण्यात येईल.

१५. **विषयांमध्ये सूट.**—जो सहायक परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेला आहे. परंतु ज्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ५५ टक्के किंवा अधिक गुण मिळविलेले आहेत त्याला त्याच्या नंतरच्या प्रयत्नांमध्ये त्या विषयासाठी परीक्षेला बसण्यातून व उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येईल.

१६. **परीक्षेला बसण्यासाठी अर्ज.**—एखाद्या वर्षामध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेला बसण्याची सहायकाची इच्छा असेल तर तो परिशिष्ट "ब" मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे त्या वर्षीच्या १ ऑगस्टपूर्वी लेखी अर्ज करील.

## परिशिष्ट 'अ'

[ नियम ११(२) पहा ]

**महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालय दुय्यम सेवेमधील अधीक्षकांच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसाठी पाठ्यक्रम**

| प्रश्नपत्रिका क्रमांक | विषय | प्रश्नपत्रिकेचा कालावधी | गुण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| एक | (अ) भारताचे संविधान ..<br>(ब) विधानमंडळ नियमपुस्तिका व नियम ..<br>(क) महाराष्ट्र लोकसेवा आयोग नियम व विनियम .. | तीन तास | १०० |
| दोन | (अ) वर्तणूक, शिस्त व अपील नियम आणि विभागीय चौकशी नियमपुस्तिका.<br>(ब) सेवा प्रवेश नियम ..<br>(क) टिप्पणी लेखन व मसुदा लेखन .. | तीन तास | १०० |
| तीन | (अ) महाराष्ट्र नागरी सेवा नियम ..<br>(ब) अर्थसंकल्प नियमपुस्तिका ..<br>(क) मुंबई वित्तीय नियम, १९५९ ..<br>[ प्रकरण—एक, दोन, सात, नऊ, अकरा व बारा-बाब (सात) वगळून ].<br>(ड) मुंबई आकस्मिक खर्च नियम, १९५९ ..<br>[ कलम—नऊ, दहा, बारा, तेरा, चौदा, अठरा (एक) (पाच) (नऊ) (दहा) वीस (एक) एकवीस, पंचवीस, सव्वीस (एक) आणि (तीन) अठ्ठावीस, तीस, एकतीस, बत्तीस आणि तेहतीस वगळून ]. | तीन तास | १०० |
| चार | (अ) सचिवालयीन अनुदेश ..<br>(ब) कार्यनियमावली (पहिली अनुसूची वगळून) ..<br>(क) कार्य नियमावली-अन्वयेचे अनुदेश ..<br>(ड) कार्यालयीन कार्यपद्धतीची नियमपुस्तिका ..<br>(ई) वर्गीकृत माहिती व कागदपत्रे याबाबत घ्यावयाची खबरदारी आणि मांडणी याबाबत नियम. | तीन तास | १०० |

२. प्रश्नपत्रिका एक व टिप्पणी व मसुदा लेखन वगळून प्रश्नपत्रिका दोन आणि प्रश्नपत्रिका तीन यांमध्ये पुस्तकांचा वापर करता येईल.

## परिशिष्ट 'ब'

(नियम १६ पहा)

### मंत्रालय दुय्यम सेवेतील अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेच्या प्रवेशासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

#### भाग एक

१. अर्जदारांचे नाव (संपूर्ण नाव) ..

२. विभाग ..

३. उच्च स्तरामधील (अप्पर डिव्हिजन) अखंड सेवेच्या प्रारंभाचा दिनांक.

४. सहायकासाठी घेण्यात येणारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष (परीक्षेचा दिनांक).

५. अर्जदार परीक्षा देऊ इच्छित आहे ते वर्ष ..

६. अर्जदाराला नियम १५ अन्वये—

कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये सूट मिळाली आहे काय ? याचे उत्तर होकारार्थी असेल तर खालील तपशील द्यावा—

(अ) परीक्षेला बसला होता ते वर्ष ..

(ब) आसन क्रमांक ..

(क) ज्या प्रश्नपत्रिकांमध्ये सूट मिळाली त्या प्रश्नपत्रिका.

(ड) मिळालेल्या गुणांची टक्केवारी ..

दिनांक : अर्जदाराची सही

---

(उमेदवाराच्या विभागाने भरावयाचे)

#### भाग दोन

भाग एकमधील बाब क्रमांक ३, ४ व ६ मध्ये अर्जदाराने दिलेला तपशील तपासलेला आहे आणि तो अचूक असल्याचे आढळून आले आहे.

कार्यासन अधिकारी,

कार्यासन क्रमांक ................

दिनांक .................... .................... विभाग

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. टी. चारी,

महाराष्ट्र शासनाचे सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई